पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in


# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा1/ 1561/87 /2023 पुणे 1 दिनांक: /09/2023 04/01/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

**समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिटयूट, मु.पो. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे संचालित**
**समर्थ गुरुकुल, ( 27250704802 ) बांगरवाडी, पो. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे**

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ -

1.शासन निर्णय क्र. स्वयंअ-2013/(85/13)/माशि 1, दिनांक 15/06/2013 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई

2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-202/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/2013,दिनांक 15/09/2013

**3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव** 20/07/2023

**4.श्रीम. अनिता शिंदे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर, जि.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल** 14/08/2023

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 5 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिटयूट, मु.पो. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे** | **समर्थ गुरुकुल, ( 27250704802 ) बांगरवाडी, पो. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे** | इंग्रजी सी.बी.एस.ई. | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 5 वी | 2013-14 |

**अटी व शर्ती**

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनाच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ संलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. स्वयंअ-2013/(85/13)/माशि 1, दिनांक 15/06/2013 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ट प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यात येईल.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे